## मानीव खरेदीखत

# Deemed Conveyance

मोफा [MOFA] कायदयान्वये, जमीन मालक/विकसक यांची मिळकत हस्तांरणासंबंधी कायदेशीर जबाबदारी आहे. मात्र, तरीही ब-याच ठिकाणी विक्री करार करून सदनिकांचा ताबा देण्याचा टप्पा पूर्ण करण्यात आला आहे आणि सदनिकाधारक संबंधित सदनिकांचा उपभोग घेत आहेत. मात्र, त्या विकसित मिळकतीचे[ जमीन व त्यावरील बांधकाम ] खरेदीखत सहकारी गृहरचना संस्था/ असोसिएशन ऑफ अपार्टमेंट ओनर्स /कंपनी यांचे लाभात करून देण्यात आलेले नाही.

या बाबींचा विचार करुन शासनाने मोफा [ MOFA] कायदयामध्ये काही बदल केले असून, त्यानुसार सहकारी गृहरचना संस्था इ. यांचे लाभात जमीन व त्यावरील बांधकामाचे खरेदीखत करुन देण्यास जमीनमालक/विकसक टाळाटाळ करीत असल्यास, त्याबाबतची योग्य ती चौकशी पूर्ण केल्यानंतर, शासनाने यासाठी नियुक्त केलेले अधिकारी (सहकार विभागाचे जिल्हा उप निबंधक सिडकोच्या मालमत्तांबाबत सहकार विभागाचे सह निबंधक ) जमीनमालक/विकसक यांचे वतीने उक्त सहकारी गृहरचना संस्था इ. यांचे लाभात, जमीन व बांधकामाचे खरेदीखत करुन देऊ शकतील.

या रीतीने, जमीनमालक/विकसक यांच्याऐवजी शासनाच्या प्राधिकृत अधिका-याने खरेदीखत करुन देण्याच्या संकल्पनेला मानीव खरेदीखत असे संबोधले जाते.

अधिक कायदेशीर स्पष्टीकरणाकरिता कृपया महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत [ त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण ] अधिनियम,1963 या कायदयाचे कलम 11 पहावे तसेच मानवी खरेदीखताचे दस्तावरील देय मुद्रांक शुल्क व नोंदणी फी इ.याबाबत अधिक माहितीसाठी पहा याच संकेतस्थळावरील सारथी >FAQ> मानीव खरेदीखत